क्रमांक : १६१४६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १६ ऑगस्ट, २०२२

**: : परिपत्रक: :**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

अमृत महोत्सवांतर्गत दिनांक ९ ऑगस्ट, ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये राज्यात "स्वराज्य महोत्सव" चे आयोजन करण्यात येत आहे. "समुह राष्ट्रगीत गायन" हा उपक्रम दि.१७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वा राबवावयाचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, स्वराज्य महोत्सव अंतर्गत "समुह राष्ट्रगीत गायन" या उपक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालील सूचनांचे पालन करावे.

१) दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता एकाच वेळी "समूह राष्ट्रगीत गायन" होईल.

२) सकाळी ठीक ११.०० वाजता समूह राष्ट्रगीताला सुरुवात होईल व सकाळी ११.०० ते ११.०१ या एका मिनिटांमध्ये राष्ट्रगीत गायन करणे अपेक्षित आहे, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

३) समूह राष्ट्रगीत गायनाच्या वेळी जाणते-अजाणतेपणे राष्ट्रगीताचा अवमान होऊ नये, याची दक्षता घेण्यात यावी.

४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता आहे त्या ठिकाणी थांबून राष्ट्रगीत गायन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आदेशानुसार,

( सुभाष नलावडे )
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-